# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 15 April 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ एप्रिल २०२४ सायंकाळी ६.१०**

************

- लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आतापर्यंत साडे चार हजार कोटी रुपयांहून अधिकची प्रलोभनं जप्त
- उस्मानाबाद लोकसभात मतदार संघातून तीन तर लातूर मतदार संघातून एक उमेदवारी अर्ज दाखल
- नवीन तंत्रज्ञानामुळे करप्रणालीत सुधारणा तसंच करचोरी रोखण्यास मदत– उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन
- छत्रपती संभाजीनगर महापालिकेकडून विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी शिबीरांना प्रारंभ

आणि

- देशात यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पर्जन्यमान होण्याचा हवामान विभागाचा अंदाज

************

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने एक मार्चपासून आतापर्यंत सुमारे साडे चार हजार कोटी रुपयांहून अधिकची प्रलोभनं जप्त केली आहेत. निवडणूक इतिहासात आतापर्यंतची ही सर्वात मोठी कारवाई आहे. २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या काळात एकूण तीन हजार ४७५ कोटी रुपयांची प्रलोभनं जप्त करण्यात आली होती. यंदा मात्र, मतदानाचा पहिला टप्पा सुरु होण्यापूर्वीच चार हजार ६५० कोटी रुपयांपेक्षा जास्त प्रलोभनं आयोगाच्या पथकांनी देशभरातून जप्त केली आहेत. यामध्ये सर्वाधिक दोन हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेचे अंमली पदार्थ, अकराशे कोटी रुपयांच्या भेटवस्तू. ५६२ कोटी

रुपयांचे मौल्यवान धातू, ४९० कोटी रुपयांचं मद्य, तर सुमारे चारशे कोटी रुपये रोख रकमेचा समावेश आहे.

या कारवाईत राजस्थान सर्वात प्रथम, गुजरात दुसऱ्या तर तमिळनाडू तिसऱ्या क्रमांकावर आहे. या राज्यात अनुक्रमे ७७८ कोटी, ६०५ कोटी आणि ४६० कोटींहून अधिकचं साहित्य जप्त करण्यात आलं. महाराष्ट्रात आतापर्यंत ४३१ कोटी ३४ लाख रुपयांचं साहित्य जप्त करण्यात आलं असून, यामध्ये २१३ कोटी रुपयांचे अंमली पदार्थ, ६९ कोटीचे मौल्यवान धातू, ७९ कोटींच्या भेटवस्तू तर ४० कोटी रुपये रोख रकमेचा समावेश आहे.

दरम्यान, या कारवाईत प्रवाशांना विनाकारण तपासणीला सामोरे जावं लागत असल्याचं वृत्त माध्यमांमधून प्रसारित झालं होतं. ही बाब गांभीर्याने घेत निवडणूक आयोगाने मार्गदर्शक सूचना जारी करत, पर्यटक आणि नागरिकांना या तपासणीदरम्यान सौजन्याची वागणूक देण्याची सूचना संबंधित यंत्रणेला केली आहे.

****

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी आज उस्मानाबाद मतदार संघातून तीन तर लातूर मतदार संघातून एक उमेदवारी अर्ज दाखल झाला.

उस्मानाबाद इथं राष्ट्रीय समाज दलाकडून आर्यनराजे किसनराव शिंदे, विश्व शक्ती पार्टीकडून नवनाथ विश्वनाथ दुधाळ तर अर्जुन सिद्राम सलगर यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले. लातूर लोकसभा मतदार संघातून क्रांतिकारी जय हिंद सेनेचे भिकाजी गंगाराम जाधव यांनी एक अर्ज दाखल केला.

दरम्यान, उस्मानाबाद इथून आज २३ जणांनी ५९ अर्जांची तर लातूर इथून २४ जणांनी ४७ अर्जांची उचल केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

कोल्हापूर आणि हातकणंगले या दोन्ही लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार अनुक्रमे संजय मंडलिक आणि धैर्यशील माने यांनी जोरदार शक्तिप्रदर्शन करत आज उमेदवारी अर्ज दाखल केले. मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे, भाजप नेते चंद्रकांत पाटील यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कोल्हापूर मतदार संघातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी बैलगाडीतून शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करण्यापूर्वी शेट्टी यांनी दसरा चौकातील मैदानावर सभा घेतली.

सातारा लोकसभा मतदार संघातील निवडणूकीसाठी आमदार शशिकांत शिंदे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटातून आपला उमेदवारी अर्ज सादर केला. यापूर्वी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत खासदार शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार श्रीनिवास पाटील, आमदार पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह मित्रपक्षांचे पदाधिकारी आणि नेते सहभागी झाले होते.

वंचित बहुजन आघाडीचे राहुल काशिनाथ गायकवाड आणि रमेश नागनाथ बारस्कर यांनी अनुक्रमे सोलापूर तसंच माढा लोकसभा मतदारसंघातून आज अर्ज दाखल केले.

रायगड लोकसभा मतदार संघातून इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गंगाराम गीते यांच्यासह पाच उमेदवारांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केले.

रत्नागिरी–सिंधुदुर्ग मतदारसंघात आज एकही अर्ज दाखल झाला नाही.

****

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज भंडारा गोंदिया लोकसभा मतदार संघाचे उमेदवार सुनील मेंढे यांच्या प्रचारासाठी तुमसर इथं प्रचार सभा घेतली. त्यांनी आपल्या भाषणातून विरोधकांवर टीका करत विद्यमान सरकारने गरीबांसाठी राबवलेल्या योजनांची माहिती दिली.

दरम्यान, भाजपचा जाहीरनामा सर्व समाज घटकांसाठी असल्याचं फडणवीस यांनी म्हटलं आहे. ते आज नागपुरात पत्रकार परिषदेत बोलत होते. देशाची सांस्कृतिक परंपरा तसंच वारसा स्थळे जपण्यासाठी एका विशेष निधीची तरतूद या जाहीरनाम्यात असल्याची माहिती त्यांनी दिली.

****

भ्रष्टाचार आणि व्यसन मुक्त भारत हा भारतीय जनता पक्षाचा संकल्प असल्याचं भाजप नेते तथा केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत प्रदेश कार्यालयात पत्रकार परिषदेत बोलत होते.

दरम्यान, लहुजी शक्ती सेनेनं महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. मुंबईत झालेल्या कार्यक्रमात आमदार आशिष शेलार यांच्या उपस्थितीत लहुजी शक्ति सेनेचे प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे यांनी ही घोषणा केली.

अखिल भारतीय मराठा महासंघानेही महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात अखिल भारतीय मराठा महासंघाचे अध्यक्ष दिलीप जगताप यांनी ही घोषणा केली.

****

नवीन तंत्रज्ञानामुळे करप्रणालीत सुधारणा होत असून करचोरी रोखण्यास मदत होत असल्याचं, प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. नागपूर इथल्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीत भारतीय राजस्व सेवेच्या ७६व्या तुकडीच्या प्रशिक्षण समारोप सत्राला ते संबोधित करत होते. नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे कर दात्यांचा संबंधित व्यवस्थेवरील विश्वास वाढतो, ज्यामुळे नियमित कर भरण्यास प्रोत्साहन मिळतं असं मतही धनखड यांनी व्यक्त केलं. विविध विषयांमध्ये प्राविण्य प्राप्त करणाऱ्या अधिकाऱ्यांचा यावेळी राष्ट्रपतींच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

****

छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या वतीनं आजपासून मुलांसाठी उन्हाळी शिबीराला प्रारंभ करण्यात आला. मनपा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या हस्ते या शिबीराचं उद्घाटन करण्यात आलं. किराडपुरा भागात उर्दू शाळा क्रमांक एक मध्ये तसंच मनपाच्या प्रियदर्शनी विद्यालयात सुरू झालेल्या या १५ दिवसीय शिबीरात सकाळी साडे सात ते साडे दहा या वेळेत मुलांना क्रिकेट, फुटबॉल, बॅडमिंटन, स्केटिग सारखे विविध क्रीडा प्रकार, चित्रकला, मातीकला, ओरिगामी, कथाकथन, सामान्य ज्ञान, संगीत, समूहगीत, समूह नृत्य आदी कलाप्रकार शिकवले जाणार आहेत. इयत्ता पहिली ते आठवीचे विद्यार्थी यात सहभागी झाले आहेत.

****

नांदेड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून अग्निशमन सेवा सप्ताहाला जिल्हाधिकारी अभिजीत राऊत आणि महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत आजपासून प्रारंभ झाला. याअंतर्गत २० एप्रिलपर्यंत अग्निशमन सेवाबाबत जनजागृती केली जाणार आहे. आग प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज जिल्हाधिकारी राऊत यांनी यावेळी व्यक्त केली. १९४४ साली मुंबई इथं एका जहाजाला लागलेल्या भीषण आगीत हुतात्मा झालेल्या ६६ अग्निशमन जवान आणि त्यानंतरही विविध ठिकाणी अग्निशमन सेवा बजावताना वीरमरण आलेल्या सैनिकांना यावेळी अभिवादन करण्यात आलं.

****

देशात यावर्षी पर्जन्यमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याची शक्यता भारतीय हवामान खात्यानं व्यक्त केल आहे. एक जून ते ३० सप्टेंबर, या चार महिन्यांत देशात सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०६ टक्के पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं केंद्रीय भूविज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ एम. रविचंद्रन यांनी दिल्ली इथं आयोजित पत्रकारपरिषेदत सांगितलं. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात नैऋत्य मोसमी पावसाचा सुधारित अंदाज जाहीर केला जाईल.

****

लातूर स्त्री रोग संघटनेच्या अध्यक्षपदी डॉ. प्रतिभा पाटील तर सचिवपदी डॉ. मनिषा बरमदे यांची तर, संघटनेच्या कोषाध्यक्षपदी डॉ. अनुसया वलसे यांची निवड करण्यात आली. आज झालेल्या आरोग्य परिषदेत नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा पार पडला. या परिषदेत शहरातल्या १२५ डॉक्टरांनी सहभाग घेतला.

****

नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीनं आज शहरातल्या बसस्थानकावर स्वीप समितीतर्फे विविध उपक्रमांतर्गत मतदार जनजागृती करण्यात आली. यावेळी समितीचे प्रमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल आणि मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. लोकशाहीच्या बसमध्ये मतदान करुन स्वार होण्याची उद्घोषणा करत बसस्थानकावरील प्रवाशांना मतदान करण्याचं आवाहन डोईफोडे यांनी यावेळी केलं. 'मी मतदान करणार' या सेल्फी पॉईंटचे उद्घाटन करत बसवर स्टिकर चिकटवून प्रचार मोहिमेत सहभाग घेतला.

****